**<u>ठळक बातम्या</u>**

- बदलापूर प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याच्या मृत्यूला पोलीस जबाबदार असल्याचा न्यायालयीन चौकशी अहवालाचा निर्वाळा

- जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक बैठकीत डिजिटल विकासाच्या भारतीय मॉडेलवर आज चर्चा होणार

- ८५ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेचं पाटणा इथं उद्घाटन

**आणि**

- महाराष्ट्रातल्या कर्णधारांच्या नेतृत्वाखाली पहिल्यावहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला आणि पुरुष संघ अजिंक्य

**<><><><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदे याच्या कथित चकमकीमध्ये झालेल्या मृत्यूला पाच पोलीस कर्मचारीच जबाबदार असल्याचा निर्वाळा न्यायालयीन चौकशी अहवालात दिला आहे. हा अहवाल मुंबई उच्च न्यायालयाला आज सादर करण्यात आला. आरोपीशी झालेल्या झटापटीत या पाच पोलीस कर्मचाऱ्यांनी केलेला बळाचा वापर चुकीचा असून आरोपीच्या बोटांचे ठसेही बंदुकीवर आढळून आलेले नाहीत, असं अहवालात म्हटलं आहे. पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी आरोपीवर गोळीबार केल्याचा दावा संशयास्पद असल्याचंही अहवालात नमूद करण्यात आलं

आहे. आरोपी अक्षय शिंदे २३ सप्टेंबर २०२४ रोजी पोलिसांच्या चकमकीत ठार झाला होता. त्यानं पोलिसांची बंदूक हिसकावून घेऊन पोलिसांवर गोळीबार केल्याचा आणि त्याला प्रत्युत्तर म्हणून पोलिसांनी केलेल्या गोळीबारात त्याचा मृत्यू झाल्याचा दावा पोलिसांनी केला होता.

**<><><><><><>**

जागतिक आर्थिक मंचाची ५५वी वार्षिक बैठक आज स्वित्झर्लंडमधील दावोस इथं सुरू होत आहे. या पाच दिवसांच्या कार्यक्रमात सर्वसमावेशक विकास आणि डिजिटल क्रांतीच्या भारतीय मॉडेलविषयी विशेष चर्चा केली जाईल. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील, नागरी विमान वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू, अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान आणि कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी हे भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व करतील. भारताच्या प्रभावी आर्थिक विकास दरानं, प्रमुख क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय विकासासह संपूर्ण जगाचं लक्ष वेधून घेतलं आहे आणि देशाला जागतिक स्तरावर एक अग्रगण्य स्थान मिळाल्याचं वृत्त आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं दिलं आहे.

दरम्यान, जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेत सहभागी होण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल स्वित्झर्लंडमध्ये दाखल झाले. बृहन महाराष्ट्र मंडळाच्या वतीनं तसंच विविध संस्थांच्या वतीने त्यांचं उत्साहात स्वागत करण्यात आलं. स्थानिक मराठी मंडळींनी पारंपरिक पद्धतीनं लेझीम खेळत, मराठी गौरवगीत सादर केलं. मुख्यमंत्र्यांनी उपस्थित मराठी समुदायाशी मनमोकळा संवाद साधला.

**<><><><><><>**

विधीमंडळाद्वारे देशातल्या नागरिकांची सेवा करण्याची महत्त्वाची जबाबदारी पीठासीन अधिकाऱ्यांवर आहे, असं प्रतिपादन लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी केलं. पाटण्यात सुरू झालेल्या ८५ व्या अखिल भारतीय पीठासीन अधिकारी परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते आज बोलत होते. विधीमंडळात होणारे गोंधळ आणि त्यांचं पावित्र्य जपा. संविधानानं घालून दिलेल्या मूल्यांच्या आधारे नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करा, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

लोकसभा, राज्यसभेसह देशाच्या विविध भागातून आलेले विधीमंडळांचे अध्यक्ष आणि इतर अधिकारी यात सहभागी झाले आहेत. याविषयी आकाशवाणीशी बोलताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले…

**होल्ड बाईट - राहुल नार्वेकर ( १२ सेकंद)**

संविधानाच्या अंमलबजावणीला ७५ वर्ष होत असताना संसद आणि राज्य विधीमंडळांचं संविधानाच्या बळकटीतलं योगदान यावर या संमेलनात विशेष चर्चा होणार आहे.

**<><><><><><>**

बिना भेसळीचं दूध उत्पादन ही काळाची गरज असून त्यासाठी या क्षेत्रातल्या संशोधकांची भूमिका महत्त्वाची असल्याचं प्रतिपादन राज्याच्या पशुसंवर्धन आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज नागपुरात केलं. माफसू अर्थात महाराष्ट्र पशू विज्ञान आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठाअंतर्गत

नागपूरच्या पशुवैद्यकीय महाविद्यालयात वॅन्कॉन अर्थात वर्ल्ड ऍनिमल न्यूट्रिशन कॉन्फरन्सच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. या तीन दिवसीय परिषदेतून व्यावहारिक उपाय सुचवले जातील, असं त्या म्हणाल्या.

जगामध्ये भारत सर्वात जास्त दूध उत्पादन करणारा देश आहे, तर महाराष्ट्र हा दूध उत्पादनामध्ये सातव्या क्रमांकावर आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

भारत आणि श्रीलंका यांनी दोन्ही देशांमधील ऊर्जा सहकार्य अधिक बळकट करण्यासाठी सामपूर सौर ऊर्जा प्रकल्पातील ऊर्जेसाठी प्रति युनिट किंमत निश्चित केली आहे. नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन आणि सिलोन इलेक्ट्रिसिटी बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमानं नुकतेच ५ पूर्णांक ९७ अमेरिकी सेंट प्रति किलोवॅट प्रती तास, अशी किंमत निश्चित करण्यात आली आहे, श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके यांनी काल एका जाहीर सभेत ही माहिती दिली. अक्षय ऊर्जा क्षेत्रात १३५ मेगा वॅटचा हा प्रकल्प द्विपक्षीय ऊर्जा सहकार्यामध्ये भारताच्या योगदानाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे.

**<><><><><>**

भारताच्या महिला आणि पुरुष संघानं पहिल्यावहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत विजेतेपद पटकावलं आहे. काल रात्री झालेल्या दोन्ही सामन्यात भारतीय संघांनी वेग, रणनिती आणि कौशल्याचं उत्तम प्रदर्शन केलं. भारतीय पुरुष संघानं नेपाळला ५४-३६ असं नमवत विश्वचषकावर नाव कोरलं तर महिला संघानं नेपाळच्या महिला संघाला ७८-४० अशी

मोठ्या फरकानं मात दिली. नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी इनडोर स्टेडियमवर झालेल्या या सामन्यांमध्ये भारतानं पहिल्यापासूनच निर्विवाद वर्चस्व गाजवलं आणि नेपाळला रोखून धरलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दोन्ही संघांचं अभिनंदन केलं आहे. महिला आणि पुरुष संघाचा विजय देशाच्या तरुण पिढीला प्रेरणादायक ठरेल, असे गौरवोद्गार राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी काढले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही दोन्ही संघांचं कौतुक केलं आहे. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**होल्ड व्हीसी**

*भारतीय पुरुष संघानं संपूर्ण विश्वचषकात शानदार प्रदर्शन केलं. अंतिम सामन्यातही आपल्या चमकदार कामगिरीच्या जोरावर भारतीय पुरुष संघ जगज्जेता ठरला आहे. त्याआधी भारतीय महिला संघानेही अंतिम सामन्यात मोठ्या फरकाने विजय मिळवत पहिल्यावहिल्या विश्वचषकावर नाव कोरलं आहे. या खोखो विश्वचषकाचं वैशिष्ट्य म्हणजे दोन्ही विश्वविजेत्या भारतीय संघांचे कर्णधार प्रतीक वाईकर आणि प्रियांका इंगळे हे मराठी आहेत. खेळाडूंप्रमाणे पुरुष संघाचे प्रशिक्षक शिरीन गोडबोले, महिला संघाच्या प्रशिक्षक प्राची वाईकर आणि फिजीओथेरपीस्ट डॉक्टर अमित राहवाटे यांचंही या विजयात मोलाचं योगदान आहे.*

<><><><><>

पश्चिम बंगालमधल्या आर जी कार रुग्णालयातल्या डॉक्टरवरच्या बलात्कार आणि खूनप्रकरणी दोषीला न्यायालयानं जन्मठेपेशी शिक्षा सुनावली आहे. सियालदाहमधल्या सीबीआयच्या विशेष न्यायालयानं हा निकाल दिला. पीडीतेच्या कुटुंबाला १७ लाख रुपये देण्याचे आदेशही न्यायालयानं दिले आहेत. आरोपी संजय राय याला शनिवारी दोषी ठरवलं होतं. गेल्यावर्षी ऑगस्ट महिन्यात ही घटना घडली होती.

<><><><><>

भारतात घुसखोरी करुन  बेकायदा वास्तव्य करणाऱ्या २५ पेक्षा अधिक बांगलादेशींना ठाणे, भिवंडी, कल्याण, उल्हासनगर आणि वागळे इस्टेट या पाच परिमंडळातल्या ३५ पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रातल्या पोलिसांनी अटक केली आहे. अभिनेता सैफ अली खान यांच्यावर हल्ल्यातला आराेपी बांगलादेशी संशयित असल्याची माहिती समाेर आल्यामुळे ही कारवाई आता आणखी तीव्र केली जाणार असल्याची माहिती ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाचे पाेलिस उपायुक्त अमरसिंह जाधव यांनी दिली. त्यासाठी बांधकामांची ठिकाणं आणि मजूर वस्तीत कोबिंग ऑपरेशन केलं जाणार आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थींना कायमस्वरुपी रोजगार द्यावा, विद्यावेतनात वाढ करुन ते नियमित आणि वेळेवर द्यावं या प्रमुख

मागण्यांसाठी आज मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी संघटनेनं गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. जुन्याच आस्थापनेवर कायम करावं, ही मागणीही करण्यात आली. या मोर्चात २ हजारांहून अधिक प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

<><><><><><>

छत्रपती संभाजीनगर इथं आयोजित दहाव्या अजिंठा वेरुळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा काल सिनेदिग्दर्शिका फराह खान यांच्या उपस्थितीत समारोप झाला. या समारोप सोहळ्यात सर्वोत्कृष्ट चित्रपटासाठीचा सुवर्ण कैलास पुरस्कार शांतिनिकेतन या चित्रपटाला प्रदान करण्यात आला. ऑस्कर विजेते साउंड डिझायनर पद्मश्री रसुल पुकुट्टी, राज्य चित्रपट रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक धनंजय सावळकर यावेळी उपस्थित होते.

<><><><><><>

महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित २१ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी बीड केंद्रावर २३ ते २५ जानेवारी या कालावधीत यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात सकाळी १० ते ५ या वेळेत होणार आहे. या फेरीत एकूण १७ बालनाट्य सादर केली जाणार असल्याची माहिती संचालक बिभीषण चवरे यांनी दिली.

<><><><><><>

रिक्षाचालकाने दुचाकीला धडक दिल्यामुळे जमावाने दगडफेक केल्याचा प्रकार काल नंदुरबारमध्ये घडला. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना

अश्रुधुराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. संशयित आरोपींचा शोध घेतला जात असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन पोलिसांनी केलं आहे.

**<><><><><><>**

अमेरिकेचे ४७ वे राष्ट्राध्यक्ष म्हणून डोनाल्ड ट्रम्प आज शपथ घेणार आहेत. ते वॉशिंग्टन डीसी इथं अमेरिकेचे मुख्य न्यायाधीश जॉन रॉबर्ट्स यांच्या उपस्थितीत राष्ट्रपती पदाची शपथ घेतील. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज रात्री साडेआठ वाजता शपथविधी सोहळा सुरू होणार आहे. सत्तेच्या अधिकृत हस्तांतरणाचा भाग म्हणून ट्रम्प उद्घाटन भाषण देखील करतील. जेडी व्हॅन्स अमेरिकेचे उपाध्यक्ष म्हणून शपथ घेतील.

**//<><><><><><>//**